ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १६ मे, १९५१ अंक २०

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )
स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर मांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर मांडवल | ... | ५,०१,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ९१,००० |
| खेळतें मांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B,
मॅनेजर

## दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें मांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल मांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतिलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

खालील कंपन्यांचा माल आमचेकडे
घाऊक व किरकोळ मिळतो.
या मालाची यादी मागवा.
म्हैसूर किर्लोस्कर लि. ............ किर्लोस्कर बंधु, लि.
किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं....किर्लोस्कर ऑईल एंजीन्स लि.
ओगले ग्लास वर्क्स लि. ............शिवाजी वर्क्स लि.
जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. ... बेळगांव मोटार्स
पॅरी आणि कं. लि.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें २

## विविध माहिती.

**भाक्रा धरणाच्या पायाचा दगड**—भाक्रा येथें बांधावयाच्या धरणाच्या पायाचा दगड नुकताच बसविण्यांत आला. धरण १९५६ अखेर पुरें व्हावयाचें आहे. धरणाच्या भिंतीची उंची पायापासून ६०८ फूट होईल. धरणामुळें ५० मैल लांब व दोन ते तीन मैल रुंद असें तळें निर्माण होईल. भाक्रा धरणापासून काढण्यांत येणाऱ्या कालव्यांची लांबी ५७८ मैल होईल. भाक्रापासून सुमारें ८ मैलावर नांगल येथेंहि एक धरण बांधण्यांत येत आहे.

**चुकविलेल्या करांची वसुली**—ता. १ नोव्हेंबर, १९५० ते ३१ मार्च, १९५१ पर्यंतच्या मुदतींत इनकम टॅक्स, सुपर टॅक्स आणि एक्सेस प्रॉफिट टॅक्स करांची चुकविलेली बाकी म्हणून २८७ लाख रुपये वसूल करण्यांत आले. ह्या कालांत तडजोडीनें १०१ प्रकरणें मिटविण्यांत आलीं, आणि त्यामुळें २६३ लाख रुपये कर बसविण्यांत आला.

**शहरांच्या नकाशांसाठी विमानांची मदत**—मोठमोठ्या शहरांचे नकाशे तयार करण्याच्या कामीं भारतांत आतां विमानांचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे. नागपूर, इंदूर, दरभंगा, अजमीर, जमशेटपूर, इत्यादि शहरांचे नकाशे तयार करण्यासाठी विमानांतून फोटो घेण्यांत आले आहेत. अहमदाबाद नगरपालिकेच्या विनंतीवरून त्या शहराचे फोटोहि १०,००० फूट उंचीवरून घेण्यांत आले आहेत. आशिआ खंडांत नकाशासाठीं विमानांचा उपयोग करण्याचें हें तंत्र भारतानें चांगलें कमाविलें आहे, असें समजतें.

**मिसेस रूझवेल्ट भारतांत येणार**—अमेरिकेचे माजी अध्यक्ष मि. रूझवेल्ट ह्यांच्या पत्नी मिसेस एलिनॉर रूझवेल्ट येत्या हिंवाळ्यांत भारतांत येतील असें समजतें. पंतप्रधान पं. नेहरू ह्यांच्या विनंतीनुसार ही भेट होणार आहे. पूर्वेकडील देशांत मिसेस रूझवेल्ट प्रथमच येत आहेत. ह्या देशांत प्रवास करून मिळविलेली माहिती त्या अमेरिकेंत गेल्यावर रेडिओ व टेलिव्हिजनच्या साह्यानें अमेरिकन लोकांना देणार आहेत.

**श्री. चिंतामणि देशमुख**—इंटर नॅशनल मॉनेटरी फंड व बँक ह्या संस्थांचे भारताचे गव्हर्नर म्हणून श्री. चिंतामणि देशमुख ह्यांची नेमणूक सरकारनें आणखी पांच वर्षांकरतां केली आहे. १९४६ सालीं श्री. देशमुख ह्यांची पहिली नेमणूक झाली होती. ह्या संस्थेचे जे पांच प्रमुख संस्थापक होते त्यांत भारतहि होता. बँकेचे गव्हर्नर म्हणून प्रत्येकाला वार्षिक अधिवेशनाच्या प्रसंगीं पाळीनें अध्यक्षपद स्वीकारावें लागतें.

**भारतासाठी जपान बोटी बांधणार**—ग्रेट ईस्टर्न शिपिंग कंपनी ह्या भारतीय सामुद्रिक वाहतुक कंपनीनें एका जपानी कंपनीशीं करार करून, आपल्यासाठी दोन बोटी बांधण्याची मागणी नोंदविली आहे. दोन्ही बोटी सुमारें २,००० टन वजनाच्या असतील. एका बोटीची किंमत १,२५,००० पौंड आणि दुसरीची १,१८,७५० पौंड आहे.

**उधार-उसनवार मालमत्तेबाबत लवाद**—गेल्या महायुद्धांत अमेरिकेनें रशिआला उधार-उसनवार पद्धतीनें सुमारें १०,८००,००० डॉलर्स किंमतीचा माल पुरविला होता. ह्या मालाच्या किंमतीबद्दल व देण्या-घेण्याबद्दल मतभेद झाल्यामुळें हा वाद लवादाकडे सोंपविण्यांत यावा, असें अमेरिकेतर्फे सुचविण्यांत आलें आहे. लवाद मंडळांत एक प्रतिनिधि अमेरिकेचा, एक रशिआचा आणि तिसरा इंटर नॅशनल कोर्ट ऑफ जस्टिसनें नेमावा असें अमेरिकेचें म्हणणें आहे.

**नृत्याची सरकारी परीक्षा**—मद्रास सरकारनें टेक्निकल परीक्षांत नृत्याची परीक्षा घेऊन प्रमाणपत्रें देण्याचें ठरविलें आहे. ह्या अभ्यासक्रमाचे कनिष्ठ व वरिष्ठ असे दोन भाग आहेत. पहिली परीक्षा चालू सालच्या नोव्हेंबरमध्यें घेण्यांत येणार आहे. दक्षिण भारतांत ह्या विषयाचा अभ्यासक्रमांत समावेश करणारें मद्रास हें पहिलेंच राज्य आहे.

**रावळगांवचा साखरेचा कारखाना**—रावळगांव येथील साखरेचा कारखाना साखरेच्या खुल्या बाजारांत सुमारें ८,६०० पोतीं साखर विकूं शकेल असें समजतें. अहवालाच्या वर्षी कारखान्याला ८·६३ लाख रुपये नफा झाला. त्याच्या मागील सालीं १·६६ लाख रुपये नफा झाला होता. भागांवर १४ टक्के नफा वाटण्यांत येणार आहे.

**भाताच्या पिकाचा उच्चांक**—पालघर तालुक्यांतील एका शेतकऱ्यानें एका एकरांत ७४½ मण भात पिकवून दाखविलें आहे. भाताच्या एकरी पिकांत हा उच्चांक आहे. ह्या शेतकऱ्याला १०० रुपयांचें बक्षिस देण्यांत आलें आहे. इतर तीन शेतकऱ्यांनाहि बक्षिसें देण्यांत आलीं आहेत.

**तापी योजनेचें कर्ज**—तापी-पाटबंधाऱ्याच्या योजनेसाठी उभारावयाच्या कर्जाची मुदत ४ मे रोजीं संपत होती. परंतु लोकांच्या व कांहीं संस्थांच्या आग्रहावरून सरकारनें कर्ज देण्याची मुदत ता. १८ मेपर्यंत वाढविली आहे.

**कृत्रिम दांतांचा कारखाना**—कलकत्त्याला प्लॅस्टिक दांतांचा एक कारखाना प. बंगालच्या सरकारनें काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्याची यंत्रसामुग्री लवकरच येईल. कारखान्यांत दरवर्षी सुमारें १० लाख कृत्रिम दांत तयार होतील आणि सरकारला समाधानकारक नफा होईल असा अंदाज आहे. भारतांत दरवर्षी सुमारें २ कोटी कृत्रिम दांत खपतात. अशा प्रकारचा कारखाना भारतांत हा पहिलाच आहे.

**लेनिनच्या ग्रंथांचा खप**—सोव्हिएट रशिआमध्यें लेनिनच्या ग्रंथांचा खप २०,९०,००,००० प्रतींपर्यंत आहे असें जाहीर करण्यांत आलें आहे. एकूण प्रतींपैकी १६,७४,२५,००० प्रती रशिअन भाषेंतील आहेत आणि ३०,९,२४,००० प्रती रशिआंत बोलल्या जाणाऱ्या इतर भाषेंतील आहेत. सुमारें १,०७,६१,००० प्रती परदेशी भाषेंतील आहेत. लेनिनच्या ग्रंथांचीं भाषांतरें एकूण ७७ भाषांतून झालीं आहेत.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
डमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १६ मे, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९४८–४९ चें हिंदचें राष्ट्रीय उत्पन्न

हिंद सरकारनें ऑगस्ट १९४९ मध्यें प्रो. महालनाबिस यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज करण्यासाठीं कमिटी नेमिली होती. प्रो. डी. आर. गाडगीळ व डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव हे या कमिटीचे सभासद होते व मि. स्टोन, प्रो. कुझनेट्स व डॉ. डर्कसन या परकी तज्ज्ञांचा सल्ला कमिटीला मिळाला होता. या कमिटीनें आपल्या चौकशीचा प्राथमिक अहवाल तयार केला असून त्यांत असें जाहीर केलें आहे कीं, १९४८–४९ सालीं हिंदचें राष्ट्रीय उत्पन्न रु. ८७१० कोटी होतें व दर माणशीं सरासरी वार्षिक उत्पन्न रु. २२५ होतें. कमिटीचा विस्तृत अहवाल १९५२ सालीं प्रसिद्ध होईल.

१९४८–४९ या वर्षाचें उत्पन्न ठरवितांना शेतीच्या व त्यासारख्या पिकांचें उत्पन्न, कारखानी मालाचें उत्पन्न, सरकारचें व सरकारी कारखान्यांचें उत्पन्न, आयात–निर्यात, व्यापारी उलाढाली, कामगार वर्गाचें उत्पन्न इ. सर्व विचारांत घेतलें आहे. १९४८–४९ सालच्या उत्पन्नापैकीं ४८ टक्के उत्पन्न शेती व तत्सम पिकांपासून मिळालें आहे, वाहतूक व दळणवळण यांपासून २० टक्के उत्पन्न मिळालें आहे व १० टक्के उत्पन्न लहान प्रमाणांत चालणाऱ्या धंद्यांपासून मिळालें आहे. प्रत्यक्ष श्रम करणाऱ्या लोकांची संख्या सुमारें १३ कोटी, २७ लक्ष असून त्यांपैकीं ६८ टक्के लोक शेतीवर व १३॥ टक्के लोक उद्योग-धंद्यांत आहेत असा कमिटीचा अंदाज आहे. एकूण रु. ८७१० कोटी उत्पन्नापैकीं ४६६० कोटी रुपये म्हणजे ५८ टक्के उत्पन्न केवळ अन्नधान्यावर खर्च झालें आहे. ५८ टक्के इतकें प्रचंड उत्पन्न धान्य इ. साठीं खर्चीं पडतें यावरून हिंदचें सर्वसामान्य आर्थिक जीवन कितीं हलक्या दर्जाचें आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्न ठरवितांना हिंदची लोकसंख्या ३४ कोटी, १० लक्ष धरण्यांत आली आहे. १९५२ मध्यें कमिटीचा संपूर्ण अहवाल प्रसिद्ध केला जाईल त्यांत १९५१ च्या खानेसुमारीचे आंकडे विचारांत घेतले जातील. खानेसुमारीच्या आंकड्यांवरून तयार करण्यांत आलेलीं विशेष कोष्टकें विचारांत घेतलीं जातील. लेबर मिनिस्ट्रीनें केलेल्या ग्रामीण पाहाणीचा अहवाल, राष्ट्रीय सँपल सर्व्हेचा पहिला व दुसरा अहवाल, कारखान्यांची सुधारलेली खानेसुमारी, हींहि विचारांत घेतलीं जातील.

नॅशनल इन्कम कमिटीच्या अहवालावरून उत्पन्न कोण-कोणत्या प्रकारांपासून होतें हें स्पष्टपणें कळून येत असल्यामुळें हा अहवाल प्लॅनिंग कमिशनचें कार्य व कोलंबो योजना या दृष्टीनें विशेष मार्गदर्शक ठरेल. आर्थिक जीवनाच्या निरनिराळ्या बाजूंचा कमकुवतपणा लक्षांत येऊन विकासाचें कार्य कोणत्या बाबतींत केलें पाहिजे हें यावरून कळून येईल. हिंदची अर्थ-व्यवस्था ग्रामीण जीवनानें कशी भारलेली आहे हेंहि स्पष्ट होतें. यामुळें हा अहवाल विशेष उपयुक्त ठरेल.

## पडीक जमिनीच्या लागवडीस विलंब

भारतीय सरकारनें मध्यभारतांतील २० लाख एकर पडीक जमीन लागवडीखालीं आणण्याची ७ वर्षांची योजना आखलेली प्रसिद्धच आहे. अशा प्रकारच्या योजनांपैकीं ही योजना जगां-तील एक मोठी योजना असून तिला आंतरराष्ट्रीय बँकेची एक कोटी डॉलर्सची मदतहि मिळालेली आहे. परंतु पडीक जमीन लागवडीला योग्य करण्याच्या कामांत जशी प्रगति व्हावयास पाहिजे होती तशी होत नाहीं. मूळच्या कार्यक्रमापेक्षा प्रत्यक्ष झालेलें काम बरेंच मागें पडलेलें आहे आणि त्यामुळें आतां अधिक खर्च येणार आहे असें समजतें. ह्या कामांत कोठें बिघाड झाला आहे तो शोधून काढण्यासाठीं बँकेनें आपला तांत्रिक तज्ज्ञ प्रतिनिधि भारतांत पाठविला होता त्यानें आपला अहवाल सादर केला असून सध्या त्यावर भारत–सरकार व बँक विचार करीत आहेत. बँकेच्या तज्ज्ञानें अशी सूचना केली आहे कीं सर्व योजना एकसूत्रतेनें अमलांत आणण्यासाठीं एका मुख्य एंजिनि-अरची नेमणूक करावी आणि हातीं असलेल्या यंत्रचलित नांग-रांचा अधिक योग्य उपयोग करण्यांत यावा. ह्या नांगरांचा जितका उपयोग केला जावयास हवा तितका तो करण्यांत येत नाहीं, असेंहि अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. बँकेतर्फे तीन तज्ज्ञांचें एक मंडळ भारताला धाडण्यांत आलें आहे. बँकेला करण्यांत आलेल्या अहवालासंबंधीं भारतीय सरकारशीं हें मंडळ चर्चा करणार आहे. बँकेनें दिलेलें कर्ज कांहीं अटींवर दिलेलें आहे. योजनेचें काम कशा पद्धतीनें करण्यांत यावें यासंबंधीं सल्ला देणें व तो अंमलांत आणलेला पहाणें असे दोन्हीं अधि-कार बँकेला आहेत. बँकेच्या सल्ल्याप्रमाणें काम होत नसल्यास कर्जाची पुढील रक्कम तिला नाकारतां येईल आणि दिलेल्या कर्जाची परतफेड ताबडतोब करण्यांत यावी असा आग्रहहि धरतां येईल. भारताच्या अन्नधान्याच्या बिकट परिस्थितींत ह्या योजनेला असलेलें महत्त्व उघडच आहे.

## विजेचे दर वाढणार

मुंबई राज्यांतील १०६ शहरांना व गांवांना तेथील खासगी (बिन–सरकारी) कंपन्यांनीं चालविलेल्या पॉवर हाउसची वीज पुरविली जाते. ह्या विजेचा उत्पादन खर्च फारच वाढला असल्या-कारणानें, विजेच्या पुरवठ्याचा दर त्यांना ३३⅓% तरी वाढवून मिळण्याचा संभव आहे. पालघर–नावली, सिन्नर, माथेरान व संगमनेर येथील वीजकंपन्यांनीं आपले दर ३३% ते १००% वाढवले आहेत. सानंद वीजकंपनीचा यूनिटला ६ आ. ९ पै चा दर आतां १३ आ. ३ पै असा झाला आहे. टाटांच्या धरणाच्या पाण्यापासून निर्माण होणाऱ्या विजेचा उत्पादनखर्च विशेष वाढला नसल्यानें मुंबई, पुणें, ठाणें, कल्याण, लोणावळा, खंडाळा, देहू रोड व तळेगांव येथील विजेचा दर वाढण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें, सरकारी पॉवरहाउसची वीजहि तूर्त महाग केली जाणार नाहीं.

## कोलंबो योजनेची प्रगति

कोलंबो योजना ही व्यावहारिक दृष्टया ठरविण्यांत आल्यामुळें व शेती आणि प्राथमिक उद्योगधंदे यांवर या योजनेचा भर असल्यामुळें ही योजना यशस्वी होण्याचा बराच संभव आहे. या योजनसाठी सहा वर्षांत खर्ची पडणाऱ्या १९० कोटी पौंड रकमेपैकीं १०० कोटी पौंड रक्कम आशिया व्यतिरिक्त देशांतून जमा करावयाची आहे. यापैकीं ३० कोटी पौंड रक्कम ब्रिटनकडून स्टर्लिंग शिलकीच्या परतफेडीच्या रूपानें मिळावयाची असून त्यापैकीं हिंदच्या वाटयाला वर्षाला ३॥ कोटी पौंड येणार आहेत. हिंदचे यंदाचें अंदाजपत्रक कोलंबो योजनेचा कार्यक्रम यशस्वी व्हावा या दृष्टीनेंच तयार करण्यांत आलें आहे. कोलंबो योजनेच्या कार्यक्रमाला ऑस्ट्रेलियानें ३॥ कोटी पौंड मदत द्यावयाची ठरविलें असून त्यापैकीं ७० लक्ष पौंड पहिल्या वर्षी मिळतील. कॅनडानें पहिल्या वर्षी २॥ कोटी डॉलर द्यावयाचें कबूल केलें आहे व न्यूझीलंड पहिलीं तीन वर्षे वर्षाला १० लक्ष पौंड याप्रमाणें देणार आहे. याप्रमाणें परदेशांतून उभारावयाच्या १०० कोटी पौंड रकमेपैकीं ३५ कोटी पौंड रक्कम सहज उभारली जाणार आहे.

कोलंबो योजनेच्या यशस्वितेच्या दृष्टीनें दुसरी गोष्ट म्हणजे या योजनेंत समाविष्ट असलेल्या देशांची स्वतःची आर्थिक परिस्थिति सुधारत असल्यामुळें हे देश मूळ अंदाजापेक्षां जास्त रक्कम उभारूं शकतील. कच्च्या मालाचे बाजारभाव गेल्या वर्षापासून वाढत आहेत ही गोष्ट या परिस्थितीला कारण झाली आहे. रबराची किंमत इतकी वाढली आहे कीं त्यामुळें सीलोनला योजनेच्या पहिल्या वर्षी इतर देशांकडून मदत लागणार नाहीं व कदाचित् दुसऱ्याहि वर्षी मदतीची जरूरी भासणार नाहीं.

कोलंबो योजनेबद्दल इतर देशांची सहानुभूति निर्माण झाली आहे ही गोष्ट योजनेच्या यशाच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. अमेरिका व जागतिक बँक यांची सहानुभूति या योजनेला मिळाली आहे. अमेरिकेच्या व जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी कोलंबो योजनेच्या चर्चेत सदस्य म्हणून भाग घेतला. अमेरिकेकडून हिंदला गहूं मिळूं शकेल ही गोष्टहि महत्त्वाची समजली जाते. ही योजना यशस्वी करण्यासाठी कॉमनवेल्थमधील देशांनीं उभारलेल्या ८० लक्ष पौंडांच्या निधींतून 'टेक्निकल एड स्कीम' पुरस्कृत करण्यांत आली आहे. तांत्रिक मदत कशी देण्यांत यावी हें ठरविण्यांत आलें असून या बाबतींत अमेरिका व यूनो यांचाहि पाठिंबा आहे. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा व न्यूझीलंड या देशांनीं शिष्यवृत्त्या, उच्च व यांत्रिक शिक्षणासाठीं विशेष सवलती, कारखान्यांत प्रत्यक्ष शिक्षण मिळण्याची व्यवस्था इ. गोष्टी कोलंबो योजनेंत समाविष्ट असणाऱ्या लोकांसाठीं सुरू केल्या आहेत. या सर्व माहितीवरून कोलंबो योजनेची प्रगति होईल असें दिसतें.

---

छोटया वृत्तपत्रांचे दिवस भरले—ब्रिटनमधील रविवारच्या वृत्तपत्रांनीं आपल्या किंमतींत वाढ केली आहे. वृत्तपत्राच्या कागदाची किंमत एका टनाला ६० पौंड इतकी वाढल्यानें हा निर्णय घेण्यांत आला आहे. कागदाच्या किंमतींत झालेल्या वाढीमुळें १ पेनीला मिळणारीं छोटीं वृत्तपत्रें आतां बंद झालीं आहेत. रविवारीं निघणाऱ्या बहुतेक वृत्तपत्रांनीं आपली किंमत २ पेन्सवरून २॥ पेन्सपर्यंत वाढविली आहे.

## अध्यक्षांचे उद्गार

### बँकांसाठी स्वतंत्र पद्धतीचे रोखे

" सरकारी रोख्यांत बँका आणि विमा कंपन्या फार मोठाल्या रकमा गुंतवितात. त्यांचेसाठीं सरकारनें स्वतंत्र रोखे काढावेत. ह्या संस्थांना व्याजाच्या दरापेक्षां, बाजारभावांच्या चढउतारांची ज्यास्त काळजी वाटते. ज्यांची वर्गावर्गी करतां येणार नाहीं असे स्वतंत्र रोखे त्यांच्यासाठीं असावेत, त्यांना अल्प मुदतीच्या रोख्यांपेक्षां अर्धा किंवा पाऊण टक्का व्याज ज्यास्त मिळावें, ह्या रोख्यांत गुंतविण्याची कमाल मर्यादा प्रत्येक बँकेच्या एकूण जिंदगीच्या प्रमाणांत निश्चित करण्यांत यावी, ह्या रोख्यांचे तारणावर रिझर्व्ह बँक व इंपीरिअल बँक ह्यांचेकडून कर्ज मिळण्याची सोय असावी."

इंडियन ओव्हरसीज बँक लि. | एम. सी. एम. चिदंबरम चेट्टिअर.

---

### पॅरी अँड कंपनी

वरील कंपनीस गेल्या वर्षी २८,६४,८४२ रु. नफा झाला. डिव्हिडंड ८०% आहे. १९४९ मध्यें तें ६२½%, १९४८ मध्यें ४०% व १९४७ मध्यें २०% होतें. कंपनीचें वसूल भांडवल २० लक्ष रु. असून तिचा रिझर्व्ह फंड ३२ लक्ष रुपयांचा आहे. चालू भावानें ३४ लाखांची मालमत्ता ताळेबंदांत १८ लाख रुपयांवर आणली आहे. इन्व्हेस्टमेंटची ताळेबंदांतील किंमत २० लक्ष रु. आहे. तिचा बाजारभाव २८ लक्ष रु. आहे. पॅरी कंपनीचा व्यवहार मुख्यतः मद्रास येथें चालतो.

---

### कलकत्ता नॅशनल बँकेस ठेवी घेण्यास बंदी

कलकत्ता नॅशनल बँकेला १४ मे पासून नव्या ठेवी घेण्यास रिझर्व्ह बँकेनें प्रतिबंध केला आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ व्या कलमाप्रमाणें जे रिझर्व्ह रिझर्व्ह बँकेकडे ठेवावे लागतात, त्याचें कलकत्ता नॅशनल बँकेनें पालन न करण्याचे प्रसंग घडून आले. म्हणून ४२ ( ३ अ ) कलमाखालीं रिझर्व्ह बँकेनें हा हुकूम काढला आहे.

कलकत्ता नॅशनल बँकेची मुख्य कचेरी कलकत्ता येथें आहे. तिची स्थापना १९३५ सालाची असून तिच्या ठिकठिकाणीं ३४ शाखा आहेत. ५० लक्ष वसूल भांडवल, २४ लक्ष १५ हजार रु. रिझर्व्ह, ३ कोटी ६५ लक्ष रु. ठेवी, इत्यादि तिचा ताजा उपलब्ध तपशील आहे.


# महाराष्ट्र सहकारी विद्यालय

## पुणें १

या विद्यालयाचे वर्ग ता. २ जुलै १९५१ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९५१ च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

## श्री. चिं. वि. जोग इंग्लंडच्या मार्गावर



दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर श्री. चिंतामण विश्वनाथ जोग हे बँकेच्या वतीनें मंगळवार ता. १५ मे, १९५१ रोजीं विमानमार्गे इंग्लंडला रवाना झाले. तेथें ते सुमारें सहा महिने राहून तेथील बँकिंगच्या पद्धतीचा सूक्ष्म अभ्यास व निरीक्षण करणार आहेत. मिडलंड बँक लि. ह्या इंग्लंडमधील बड्या बँकेनें त्यांची सर्व व्यवस्था केली आहे. रिझर्व्ह बँकेनेंहि श्री. जोग ह्यांचा पुरस्कार करून त्यांना सर्व तऱ्हेची मदत केली आहे. श्री. जोग ह्यांना आम्हीं त्यांच्या नियोजित कार्यांत सुयश चिंतितों.

श्री. जोग हे प्रिन्सिपॉल वि. के. जोग ह्यांचे ज्येष्ठ पुत्र असून त्यांच्या सल्ल्यानेंच ते महाराष्ट्र बँकेस उपलब्ध झाले. १९३३ सालीं मुंबई विद्यापीठाची बी. कॉम. ची परीक्षा दिल्यावर त्यांनीं सेंट्रल बँक ऑफ इंडियांत पांच वर्षें काम केलें. त्या अवधींत त्यांनीं सी. ए. आय. आय. बी (मुंबई) व सी. ए. आय. बी. (लंडन) ह्या बँकिंगविषयक पदव्या मिळविल्या. त्यानंतर ते बँक ऑफ बरोडामध्यें चार वर्षें होते. १९४३ सालापासून ते महाराष्ट्र बँकेचे मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. म्हणजे, बँकिंगच्या व्यवसायांत ते सतत १७ वर्षें आहेत.

श्री. जोग ह्यांच्या गैरहजेरींत श्री. ग. ल. हळबे, बी. ए. हे मॅनेजरचें काम पाहतील. बँकेच्या जवळ जवळ स्थापनेपासून ते अकौंटंटचें काम करीत असून मध्यें कांहीं काळ त्यांनीं ऑफिशिएटिंग मॅनेजर म्हणूनहि काम केलेलें आहे. महाराष्ट्र बँकेंत येण्यापूर्वी ते पुणें सें. को. बँकेंत होते.

## त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., मंजुमेल

ओगले ब्रदर्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें ३१ डिसेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी ६,००,००० रुपये किंमतीचा माल तयार केला. १९४९ मधील उत्पादन ५,०६,००० रुपयांचें होतें. तयार मालाची वाढलेली किंमत, हें उत्पादनाच्या किंमतीच्या वाढीचें कारण आहे. कंपनीला ठोक नफा १,८३,३५० रु. झाला. घसारा व इतर सर्व खर्च वजा जातां निव्वळ नफा ३७,०५९ रु. उरला. त्यांत १९४९ चा शिलकी नफा मिळविला, म्हणजे नफावाटणीस ४२,२६८ रु. येतात. त्यापैकीं ४०,००० रुपयांचा विनियोग ४% डिव्हिडंडसाठीं केला जाईल. कंपनीच्या मालास उत्कृष्ट मागणी आहे, तयार झालेला माल तात्काळ खपत आहे आणि बाजारभावहि स्थिर आहेत. शीट ग्लास मशिनरी तावडतोब उतरवून घेतली तरी ती बसविण्यास लागणारें भांडवल हातीं आल्यावरच पुढील काम सुरू केलें जाईल. बाटल्या तयार करण्याचीं ऑटोमॅटिक मशीन्स बसविण्याची योजनाहि जादा भांडवलाची वाट पाहात आहे. ह्या योजनेमुळें उत्पादन दुप्पट होऊन नफ्याचें प्रमाण पुष्कळच वाढेल. कंपनीचें वसूल भांडवल ९,९५,१५० रु. रिझर्व्ह फंड १,००,००० रु.चा आहे. एकूण ताळेबंद १२,६३,९७२ रुपयांचा आहे.

---

## दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

वरील बँकेस १९५० सालीं ५१,९७५ रु ३ आ. ११ पै नफा झाला. त्यांत १९४९ चा शिलकी नफा मिळविला, म्हणजे नफावाटणीस ५२,१२८ रु. १० आ. १० पै येतात. रिझर्व्ह फंडांत १२,००० रु. टाकून, ८,५०० रु. ची इन्कम टॅक्सची तरतूद करून आणि ३,१८७ रु. इन्व्हेस्टमेंट फ्ल. फंडाकडे वर्ग करून ४½% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठीं २७,००० रु. चा विनियोग करण्यांत आला. बँकेचा एकूण ताळेबंद ५३,४१,५८५ रु. चा आहे. त्यांत ११,५९,९६२ रु. बँकेचे स्वतःचे आहेत आणि त्यांत आतां १६,१८७ रु. ची भर पडली आहे. ह्यावरून बँकेच्या भक्कमपणाची कल्पना येईल. इतर बँकांकडून कर्ज घेतलेलें नाहीं.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भांडवल | ६,००,००० | कॅश | ४,६६,२३४ |
| रिझर्व्ह फंड | ४,४०,००० | इतर बँकांत | ३,९५,५३४ |
| इतर फंड | १,१९,९६२ | इन्व्हेस्टमेंट | १७,६५,५९२ |
| ठेवी | ३८,६८,८५६ | कर्जे | २४,०२,८२२ |

(चेअरमन: डॉ. के. जी गोसावी, एल. सी. पी. अँड एस. मॅनेजर: के. डी. शिराळकर, बी. ए.)

---

## सारस्वत बँकेची प्रगति [ १९२०–५० ]

| वर्ष जून अखेर | सभासद | शेअर भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड | ठेवी | कर्जे ओव्हरड्राफ्ट | इन्व्हेस्टमेंट्स, सरकारी रोखे, रोकड वगैरे | एकूण खेळतें भांडवल |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| १९२० | १९० | ६,००० | १,४०० | ६.८०० | ६०० | ७,३०० |
| १९३० | ४५५ | २०,९०० | २५,००० | २७,८०० | २१,९०० | ५०,००० |
| १९४० | १५२७ | १,५२,८०० | ११,५७,००० | ३,१७,४०० | ९,४३,७०० | १३,३७,००० |
| १९५० (३०–९–५० ) | ३०८३ | ७,३४,००० | १,००,६९,७०० | २७,७६,५०० | ७९,०२,३०० | १,०९,३१,७०० |

## दि इंडियन बँक लि ; मद्रास

( स्थापनाः १९०७ )

**३१ डिसेंबर १९५० रोजींचा संक्षिप्त ताळेबंद**

| देणें | रु. | येणें | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५२,९८,३११ | कॅश | १,७९,२४,९६१ |
| रिझर्व्ह फंड | ६२,००,००० | कॉलमनी | १,००,००० |
| सिंकिंग फंड | ८,००,००० | बिल्स डिस्कौंटेड व परचेस्ड | १,२४,६६,८२७ |
| कराची तरतूद | १४,३१,११६ | | |
| ठेवी इ. | १७,८२,८७,९८६ | इनव्हेस्टमेंटस | ९,७२,२४,२६८ |
| इतर बँकांचें कर्ज | ४२,५०,८८१ | कर्जें | ६,००,७५,५२८ |
| बिल्स पेएबल | ६०,१८,७७८ | बिल्स रिसीव्हेबल | १,५८,५१ ७६४ |
| बिल्स फॉर कलेक्शन | १,५८,५१,७६४ | ॲक्सेप्टन्सेस इ. | १,३९,९८,९७१ |
| इतर देणीं | २१,६५,३८९ | इमारत | ८९,२५० |
| ॲक्सेप्टन्सेस, एंडॉर्समेंटस इ. | १,३९,९८,९७१ | सेफ्स, फर्निचर | ४,४८,२४५ |
| १९५० चा नफा | १५,६२,३१२ | इतर येणीं | ४३,११,२६५ |
| एकूण | २३,५२,८७,१८२ | | २३,५२,८७,१८२ |

**लोकसंख्येच्या दृष्टीनें भारताचें जागतिक स्थान**

| वर्ष | लोकसंख्या ( कोटी ) | वाढ | वाढ घट % |
|---|---|---|---|
| १९०१ | २३·५५ | ... | ... |
| १९११ | २४·९० | १·३५ | + ५·८ |
| १९२१ | २४·८१ | ·०८७ | – ०·३ |
| १९३१ | २७·५५ | २·७३ | + ११·० |
| १९४१ | ३१·४८ | ३·९३ | + १४·३ |
| १९५१ | ३५·६८ | ४·२१ | + १३·४ |

लोकसंख्येच्या दृष्टीनें सबंद जगांत चीनचा अनुक्रम पहिला लागतो. त्या देशाची लोकसंख्या ४६ कोटी, ३५ लक्ष आहे. त्याचे खालोखाल भारताचा अनुक्रम आहे. क्षेत्रफळाचे दृष्टीनें भारताचा अनुक्रम चौथा असून लोकवस्तीच्या दाटीच्या दृष्टीनें त्याचा अनुक्रम पांचवा आहे. जगांतील एकूण लोकसंख्येपैकीं १५·१% लोक भारताचे नागरीक आहेत.

**" हिंदी रेडिओवरील वेळ भाड्यानें देण्यास प्रारंभ करा "**

मुंबई येथील रोटरी क्लबांत भारत सरकारचे माजी डेप्युटि डायरेक्टर—जनरल ऑफ ब्रॉडकास्टिंग, श्री. व्हिक्टर प्राणजोति ह्यांनीं भाषण करतांना, हिंदी रेडिओला व्यापारी वळण लावण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. आज रेडिओ सिलोनवर जाहिरात करण्यांत येते, ती मध्यपूर्व, अतिपूर्व, आफ्रिकन व हिंदी बाजार पेठांना पोंचते. पाकिस्तानांतहि रेडिओवरील वेळ भाड्यानें देण्यास सुरवात केली जाण्याचा संभव आहे. आज हिंदी व्यापारी व कारखानदार रेडिओ सिलोनला जाहिरातीसाठीं पैसे देत आहेत; हे पैसे परदेशीं जात आहेत. शेजारच्या देशांतील रेडिओवर ऐकविण्यांत येणाऱ्या जाहिरातींमुळें भारताच्या परराष्ट्रीयच नव्हे तर अंतर्गत व्यापारावरहि प्रतिकूल परिणाम होण्याजोगा आहे, असें श्री. प्राणजोति ह्यांचें मत आहे.

## चलनी नोटांची वाढ

४ मे, १९५१ अखेरच्या रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आंकड्यां वरून असें दिसतें, कीं तिनें काढलेल्या नोटांनीं आतां १३०० कोटी रुपयांची मर्यादा ओलांडली आहे. व्यवहारांत आलेल्या नोटांची किंमत आतां १२९४ कोटी रुपये आहे. म्हणजे, चार महिन्यांत खेळत्या नोटांत १२१ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. मध्यवर्ती सरकारची रिझर्व्ह बँकेकडील शिल्लकहि १२४·५ कोटी रुपयांवर उतरली आहे.

| वर्ष | रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या नोटा ( कोटी रु. ) |
|---|---|
| १९३८-३९ | २१० |
| १९४९-५० | ११५२ |
| १९५०-५१ | ११८० |
| जाने. १९५१ | ११९५ |
| फेब्रु. " | १२२६ |
| मार्च " | १२५१ |
| ४ मे " | १३०२ |

**सारस्वत बँकेच्या पुणें कचेरीचें उद्‌घाटन**

सारस्वत को. बँकेच्या पुणें उपशाखेचें उद्‌घाटन बुधवार, ता. ९ रोजीं सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री. चिन्मुळगुंद ह्यांच्या हस्तें झालें. बँकेचे अध्यक्ष, श्री. वर्दे ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत बँकेची तपशीलवार माहिती सांगितली व उपाध्यक्ष श्री. लाड ह्यांनीं आभार मानले. श्री. चिन्मुळगुंद ह्यांनीं सारस्वत बँकेच्या उच्च दर्जाचा गौरवपर उल्लेख केला. घरांच्या तुटवड्याचा प्रश्न सोडविण्याचे कामीं सारस्वत बँकेनें हौसिंग सोसायटयांची अडचण भागवून फार महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे आणि तिनें आपली वैशिष्ट्यपूर्ण उपयुक्तता सिद्ध केली आहे, असेंहि ते म्हणाले.

**कोड झालेले कावळे**

कांहीं पांढरे कावळे मुंबई येथें दृष्टोपत्तीस आले आहेत. त्वचेचा स्वाभाविक रंग जाऊन मनुष्याला कोड होतें, तसाच प्रकार पक्ष्यांचे बाबतींतहि आढळतो. त्याला "अल्बिनिझम" म्हणतात. त्यामुळें तुरा, पाय, डोळे, इत्यादिकहि पांढरे होतात

**संयुक्त प्रांतांतील जमिनदारी फंड**—संयुक्त प्रांतांतील जमीनदारीचे हक्क रद्द करण्यासाठी जमनिदारांना देण्यांत यावयाच्या नुकसानभरपाईच्या फंडाची रक्कम २९ कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. ३२ लाख शेतकऱ्यांना भूमिदारीचे हक्क आतांपर्यंत देण्यांत आले आहेत.

**ब्रह्मपुत्रेवरील नवा पूल**—आसाम सरकार ब्रह्मपुत्रा नदीवर एक मोठा नवा पूल बांधणार आहे. त्यासाठीं सुमारें ३ कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. राज्य सरकारनें ज्या विकासाच्या योजना आखल्या आहेत त्यांतच वरील पुलाचा समावेश करण्यांत आला आहे.

**१६ मैल लांबीचा तट**—गंगा आणि कारीकोसी ह्या नद्यांच्या कांठांना पूर्णिया जिल्ह्यांत १६ मैल लांबीचा बांध घालण्याचा विचार बिहारचें सरकार करीत आहे. नद्यांना येणाऱ्या पुरामुळें जें नुकसान होतें तें टाळण्यासाठीं ही योजना आखण्यांत येत आहे. बांधासाठीं २६ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

## ब्रिटनचें १९५१ चें अंदाजपत्रक

[ मा. म. काळे ]

मि. गेटस्केल यांनीं सादर केलेल्या पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत प्राप्तीवरील करांत तीन ठिकाणीं पौंडाला ६ पेन्स या प्रमाणांत करवाढ करण्यांत आली आहे. परंतु विवाहित पुरुषांच्या व मुलांच्या भत्यामध्यें प्रत्येकीं १० पौंड वाढ करण्यांत आली आहे. करमणुकीवरील करांत वाढ आहे परंतु दारू व तंबाखू यावरील कर होते तसेच ठेवण्यांत आले आहेत. मोटारी, वायरलेस व टेलिव्हिजन सेट्स, गॅस व वीज यांवर चालणाऱ्या गृहोपयोगी वस्तू या सर्वांवर ३३⅓ टक्के कर होता तो ६६⅔ टक्के करण्यांत आला आहे. चालू वर्षी खर्चांत वाढ होण्याचीं कारणें म्हणजे लष्करी संरक्षणावर होणारा वाढता खर्च, आयातीवर होणारा वाढता खर्च व आवश्यक कच्च्या मालाचा तुटवडा या गोष्टी होत. लष्करी खर्च जितका आवश्यक आहे, तितका करणें व जरुरी पुरेशी निर्गत करणें या गोष्टींवर भर दिला जाईल, व यासाठी इंजीनियरिंग इंडस्ट्रीजच्या मालाचें उत्पादन व निर्गत जरूर त्या प्रमाणांत अशक्य झाली तर कांहीं चैनीचा गिऱ्हाइकी माल निर्गत करून ही उणीव भरून काढण्यांत येईल. वाढता लष्करी खर्च व परराष्ट्रीय व्यापाराची इंग्लंडच्या दृष्टीनें कांहींशी बिघडलेली परिस्थिति यांना तोंड देण्यासाठी उत्पादन वाढविण्याचे शक्य ते प्रयत्न केले जातील. वाढत्या किंमतीपासून संरक्षण देण्यासाठी अन्नावरील मदतीचें प्रमाण वाढवून व कापड व इतर वस्तूंवर मदत देण्याला पुन्हां सुरुवात करून सरकार सामान्य जनतेला मदत करील. परंतु हें साध्य करण्यासाठीं करवाढ केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

लष्करी उत्पादनासाठी ५०० लक्ष पौंड भांडवली खर्च करावा लागेल व १४२० लक्ष पौंड निरनिराळया मालाच्या साठ्यासाठी खर्च करावे लागतील, व यामुळें एकंदर लष्करी खर्च अंदाजी १४,९०० लक्ष पौंड होईल. म्हणजे गेल्या वर्षाच्या मानानें वा- खर्चांत ६९०० लक्ष पौंड वाढ होणार आहे. २,१०० लक्ष पौंड रकमेनें मुलकी खर्चांत वाढ होईल, व इतर कांहीं बाबींवरील खर्च ४०० लक्ष पौंडांनीं वाढणार आहे. पुढील वर्षी खर्च ४१,९७० लक्ष पौंड होईल. सामाजिक सुखसोईसाठी गेल्या वर्षी २,४२० लक्ष पौंड खर्च झाला. परंतु पुढील वर्षी या बाबतींत २५१० लक्ष पौंड खर्च होईल. निरनिराळ्या प्रकारच्या विशेषतः प्राप्तीवरील करांतील व कांहीं चैनीच्या गिऱ्हाइकी मालावरील करवाढीमुळें १,३८० लक्ष पौंड रक्कम जास्त जमा होईल व त्यामुळें वर्ष-अखेर ३९० लक्ष पौंडांची शिल्लक राहील.

मि. गेटस्केल यांनीं सादर केलेलें हें पहिलेंच अंदाजपत्रक असून ब्रिटिश वृत्तपत्रकारांनीं अंदाजपत्रकाचें सामान्यपणें स्वागत केलें आहे. या अंदाजपत्रकामुळें गेटस्केल यांची राजकीय प्रतिष्ठा वाढेल असें डेली टेलिग्राफनें म्हटलें आहे. डेली हेरल्डच्या मतें हें अंदाजपत्रक योग्य असून प्रामाणिकपणा व योग्य दृष्टिकोन दर्शविणारें आहे. संकटाच्या परिस्थितीला तोंड देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे असें मत यॉर्कशायर पोस्ट या पत्रानें व्यक्त केलें आहे. न्यूज क्रॉनिकल व डेली टेलिग्राफ या पत्रांनीं मात्र सरकारी खर्चांत काटकसर नाहीं याबद्दल असमाधान व्यक्त केलें आहे.

---

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
३, ५, १० वर्षे सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकेटें
दर १३-८, ८७-७, ७५ अनुक्रमें
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

रशिआचें नवें कर्ज–रशिअन सरकारनें ४०,०००,०००,००० रुबल्सचें २० वर्षे मुदतीचें नवें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे कर्जरोख्यांतील कांहीं नंबरांना बक्षिसें ठेवण्यांत आलीं आहेत. कर्जाला जनतेकडून चांगला पाठिंबा मिळत असून सर्व रक्कम लवकरच पुरी होईल असें समजतें. गेल्या वर्षीचें येवढेंच कर्ज अवघ्या ६ दिवसांत भरपाई झालें होतें.

**THE TRAVANCORE OGALE GLASS MFG. CO. LTD., MANJUMMEL.**

# NOTICE

The Eighth Annual General Meeting of the Shareholders of the Company will be held on Saturday the 16th June, 1951, at 4 P. M. at the Registered office of the Company at Manjummel (Glass Factory premises) to transact the following business :

1. To adopt the Directors' Report, audited Balance Sheet and Profit & Loss Account for the period ended 31st December 1950.
2. To declare a dividend.
3. To elect a Director in place of Sri. A. Raghunath Rao, the co-opted Director, who retires according to Article 107 of the Articles of Association of the Company and is eligible for re-election and offers himself as such.
4. To elect two Directors in place of the retiring Directors Sri. S. Chattanatha Karayalar and Sri. Jacob Cherian who retire by rotation according to Article 112 of the Articles of Association of the Company and are eligible for re-election and offer themselves as such.
5. To appoint auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board
For Ogale Brothers Limited,
Shankar Rao P. Ogale
Managing Agents.

Trivandrum
March 10, 1951

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday the 4th June, 1951, to Saturday, the 16th June, 1951, both days inclusive.

The Dividend when declared will be payable on and after Monday the 2nd July, 1951, to those shareholders whose names stand in the register on Saturday, the 16th June, 1951, to whom Dividend Warrants will be posted.

## सेंचरी मिलची मॅनेजिंग एजन्सी

सेंचरी स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. च्या व्यवस्थेंत झालेल्या फरकावर प्रकाश टाकणारें एक पत्रक मेसर्स चुनीलाल व्ही. मेहता अँड सन्स ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे:—" सेंचरी कंपनीची वार्षिक साधारण सभा ता. १० एप्रिल रोजीं झाली. त्यांत श्री. नवीनचंद्र मफतलाल हे डायरेक्टरच्या जागेसाठी फेर-निवडणुकीस उभे राहिले नाहींत आणि श्री. भगवानदास सी. मेहता व श्री. अंबालाल साराभाई ह्यांची वार्षिक सभेनें फेर-निवडणूक केली नाहीं. ह्या तिघांचे जागीं तीन नव्या डायरेक्टरांची निवडणूक झाली. बोर्डाची सभा २३ एप्रिल रोजीं बोलावण्यांत यावी, अशी त्यांनीं मागणी केली. त्या सभेचे आधीं श्री. डी. एम्. खटाव ह्यांनीं डायरेक्टरच्या आपल्या जागेचा राजीनामा दिला. सर चुनीलाल व्ही. मेहता अँड सन्स लि. ह्यांची कंपनीचे मॅ. एजंट म्हणून असलेली नेमणूक आणि ११ जून, १९३३ च्या ज्या करारान्वय ते मॅ. एजंट म्हणून काम करीत होते, तो करार २३ एप्रिल १९५१ पासून रद्द करणारा ठराव बोर्डाच्या सभेनें मंजूर केला. या ठरावास श्री. बी. सी. मेहता व श्री पी. सी. मेहता ह्यांनीं विरोध केला होता. ठराव मंजूर होतांच एक्स-ऑफिशियो डायरेक्टर श्री. बी. सी. मेहता ह्यांनीं सभात्याग केला व श्री. पी. सी. मेहता ह्यांनीं आपल्या डायरेक्टरशिपचा राजिनामा दिला. मॅनेजिंग एजन्सी रद्द केली, ही गोष्ट करारास सोडून आहे आणि त्याबद्दल कंपनीकडे मॅ. एजंटस् नुकसानभरपाई मागीत आहेत."

**गंधकाचा तुटवडा**—आंतरराष्ट्रीय गंधक समितीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. रशिआ व त्याच्या अंकित देश सोडून जगांतील इतर राष्ट्रांना १९५१ सालीं गंधकाचा तुटवडा भासेल असा अंदाज अहवालांत करण्यांत आला आहे. सुमारें १० लक्ष टन गंधक कमी पडण्याचा संभव आहे.

**ब्रह्मदेशांतील हिंदी बांधवांची भेट**—भारताचे अन्नमंत्री श्री. के. एम. मुनशी अन्नधान्य मिळविण्यासाठी रंगूनला जाऊन आले. त्या वेळीं तेथील भारतीय नागरिकांनीं दुष्काळग्रस्त हिंदी नागरिकांसाठी ३५० टन तांदूळ भेट म्हणून त्यांच्या हवालीं केला. हा तांदूळ बिहारमधील लोकांना फुकट वाटण्यांत येणार आहे. वहातुकीची व्यवस्था तांतडीनें करण्यांत येत आहे.

**मुलांना अन्नसत्वाच्या गोळ्या**—भारतामधील ज्या मुलांना, निकस अन्नामुळें रातांधळ्याचा विकार झाला आहे, त्यांना देण्यासाठीं २ लाख अन्नसत्वाच्या गोळ्या अमेरिकेंतील कांहीं नागरिकांनीं स्वच्छेनें दिल्या आहेत. ह्या गोळ्या न्यूयॉर्क-मधील विमानतळाहून भारताकडे नुकत्याच रवाना करण्यांत आल्या.

**प्रो. महालनबिस रशिआला जाणार**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेविषयक कमिशनचे उपाध्यक्ष प्रो. महालनबिस रशिआला जाणार आहेत. रशिआच्या सांस्कृतिक संबंध-विषयक संस्थेनें २३ हिंदी नागरिकांना रशिआंतील औद्योगिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक केंद्रें पाहण्यासाठी आमंत्रण दिलें आहे. प्रो. महालनबिस व त्यांचे इतर सहकारी रशिआंत चार आठवडे हिंडणार आहेत.

**जागतिक बँकेच्या उत्पन्नांत वाढ**—३१ मार्च, १९५१ अखेर पुऱ्या झालेल्या नऊ महिन्यांच्या कालावधींत जागतिक बँकेच्या उत्पन्नांत वाढ झालेली दिसून येते. ह्या काळांत बँकेला १,१४,८२,२३०. डॉलर्स नक्त नफा झाला. गेल्या वर्षीच्या ह्याच काळांत ९८,५६,८५६ डॉलर्स नफा झाला होता.


फोनः ३७५१९ तारः SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाविलास ', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.